RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ८] शुक्रवार, जानेवारी १६, २०२६/पौष २६, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २६**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महसूल व वन विभाग

पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जानेवारी, २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१.**

क्रमांक आयसीएच-२०२५/प्र.क्र.१६३/ल-७.— महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा. २७) याच्या कलम ४६ च्या पोट-कलम (१) व पोट-कलम (२) च्या खंड (इ) तसेच कलम २९ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे) (अतिरिक्त जमिनीचे वाटप) आणि (सुधारणा) नियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या नियमांचे पुढील प्रारूप, त्यामुळे बाधित होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ४६ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करीत आहे; आणि याद्वारे, अशी नोटीस देण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासनाद्वारे, उक्त प्रारूप दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ रोजी किंवा त्यानंतर, विचारात घेण्यात येईल.

**२.** उक्त प्रारुपाच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीकडून, अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, १ ला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी जे कोणतेही आक्षेप किंवा सूचना प्राप्त होतील, त्या शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**प्रारूप नियम**

**१.** या नियमांस, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे) (अतिरिक्त जमिनीचे वाटप) आणि (सुधारणा) नियम, २०२६ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची मर्यादा कमी करणे) (अतिरिक्त जमिनीचे वाटप) आणि (सुधारणा) नियम, १९७५ मधील नियम १२ खाली खंड (ड-१) ऐवजी पुढील खंडाचा समावेश करावा :-

"(ड-१) वाटप केलेली जमीन कृषी प्रयोजनासाठी आवश्यक असल्यास.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

1st Floor, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 16th January, 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Agricultural (Lands Ceiling on Holdings) Act, 1961.

No. ICH-2025/C.R.163/L-7.— The following draft of the rules further to amend the Maharashtra Agricultural Lands (Lowering of Ceiling on Holdings) (Distribution of Surplus Land) and (Amendment) Rules, 1975, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clause (*e*) of sub-section (*2*) of section 46 read with sub-section (*1*) of section 29 of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961 (Mah. XXVII of 1961) and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*1*) of section 46 of the said Act, for information of all the persons likely to be affected thereby, and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 13th February, 2026.

**2.** Any objection or suggestion which may be received by the Additional Chief Secretary to Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT RULES*

*1.* These rules may be called the Maharashtra Agricultural Lands (Lowering of Ceiling on Holdings) (Distribution of Surplus Land) and (Amendment) Rules, 2026.

*2.* In rule 12 of the Maharashtra Agricultural Lands (Lowering of Ceiling on Holdings) (Distribution of Surplus Land) and (Amendment) Rules, 1975, for clause (d-1) the following clause shall be substituted, namely:-

“(d-1) if the allotted land is required for agricultural purpose.”.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.